# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १५०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.१० जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## तळेगाव एमआयडीसीत गॅस गळतीने दोन कामगारांचा मृत्यू, ३ कामगार गंभीर जखमी

पुणे दि.९ (प्रतिनिधी)- मावळ तालुक्यातील तळेगाव एमआयडीसी परिसरातील नवलाख उंबरे येथे असलेल्या शॅफ्लर इंडिया कंपनीत कार्बन डायऑक्साइड गॅस गळतीची धक्कादायक घटना घडली असून, या दुर्घटनेत दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. सुरुवातीला या ठिकाणी गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याची माहिती समोर आली होती. मात्र प्राथमिक तपासाअंती कंपनीमध्ये स्फोट नव्हे, तर कार्बन डायऑक्साइड गॅस गळती झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या दुर्दैवी दुर्घटनेत गणेश उंबरे आणि वैभव थोरात या दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. तसेच, श्रीकृष्ण साहू, गौरीशंकर शर्मा आणि नरसिंह पाटील हे तीन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

या गंभीर घटनेची माहिती मिळताच कंपनी प्रशासन, एमआयडीसी सुरक्षा यंत्रणा आणि स्थानिक पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. सध्या ही गॅस गळती नेमकी कोणत्या कारणामुळे झाली, याचा सविस्तर तपास यंत्रणांकडून सुरू असून परिसरात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जात आहे. मात्र, या धक्कादायक दुर्घटनेमुळे संपूर्ण तळेगाव एमआयडीसी परिसरात मोठी खळबळ उडाली असून कामगार वर्गामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# रक्त सांडू, पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही!; हजारो शेतकरी-महिलांचा निर्धार

## कोल्हापुरात सतेज पाटील-राजू शेट्टींच्या नेतृत्वाखाली विराट जनआंदोलन




कोल्हापूर दि.९ (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाविरोधातील आंदोलन आता अधिक तीव्र होताना दिसत आहे. मंगळवारी कोल्हापुरात हजारो शेतकरी, महिला आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढत प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला. आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनी 'आमचे रक्त सांडले तरी चालेल, पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही,' असा आक्रमक निर्धार व्यक्त केला.

मोर्चात काँग्रेस नेते सतेज पाटील, शेतकरी नेते राजू शेट्टी तसेच छत्रपती शाहू महाराज सहभागी झाल्याने आंदोलनाला मोठे राजकीय आणि सामाजिक बळ मिळाले.

मोर्चात ग्रामीण भागातील महिलांची मोठी उपस्थिती होती. महामार्गासाठी जमीन संपादित झाल्यास कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात येईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. आंदोलनात सहभागी महिलांनी सांगितले की, शेती हीच आमची उपजीविका आहे. जमीन गेल्यानंतर मुलबाळांचे शिक्षण, विवाह आणि भविष्यातील आर्थिक सुरक्षितता धोक्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प स्वीकारला जाणार नाही.

मोर्चादरम्यान बोलताना सतेज पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. शेतकरी आणि स्थानिक नागरिकांना नको असलेला प्रकल्प जबरदस्तीने राबवू नये, असे ते म्हणाले. त्यांच्या मते, आधीच नागपूर-रत्नागिरी मार्गासारखे पर्याय उपलब्ध असताना नव्या महामार्गाची गरज काय, हा प्रश्न सरकारने स्पष्ट करावा. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील हजारो अल्पभूधारक शेतकरी या प्रकल्पामुळे भूमिहीन होण्याचा धोका असल्याचा दावा त्यांनी केला.

### सांगलीत ड्रोन सर्वेक्षण स्थगित

सांगली दि.९ (प्रतिनिधी)- प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गासाठी ड्रोनच्या माध्यमातून सुरू असलेला सर्व्हे मंगळवारी खानापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी बंद पाडला. अधिकाऱ्याकडून केवळ सर्व्हे सुरू असून कोणाचीही जमिन जबरदस्तीने घेतली जाणार नाही असे सांगितले जात असताना शासनावर आमचा विश्वास नाही असे सांगत शेतकऱ्यांनी शासकीय पथकाला परत पाठवले.

खानापूर तालुक्यातील नागेवाडी, भाग्यनगर, चिखलहोळ, माहुली परिसरात आज प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गासाठी ड्रोनच्या माध्यमातून सर्व्हे करण्यासाठी प्रांताधिकारी विक्रमसिंह बादल, तहसिलदार योगेश टोपे, पोलीस उप अधिक्षक विपुल पाटील, पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे आदींसह पोलीस पथक दाखल झाले होते.

महामार्गाचे ड्रोनच्या माध्यमातून सर्व्हे सुरू असल्याची माहिती मिळताच अनेक शेतकऱ्यांनी तात्काळ धाव घेतली. मोठ्या प्रमाणात जमलेल्या शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्ग रद्द झालाच पाहिजे अशा घोषणा देत सर्व्हे करण्यास तीव्र विरोध केला. यावेळी अधिकाऱ्यांनी कोणाचाही जमिन जबरदस्तीने घेतली जाणार नाही. हा केवळ सर्व्हे असून केवळ आराखडाच निश्चित करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र जमिनीच्या बदल्यात शासन आम्हाला जमिन देणार आहे का असा सवाल करत शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. शेतकऱ्यांचा रोष पाहिल्यानंतर अधिकाऱ्यांनी सर्व्हेचे काम स्थगित केले आहे. मात्र, जोपर्यंत शासन शयतीपीठ महामार्ग रद्द करत नाही तोपर्यंत आमचा संघर्ष सुरूच राहील असेही यावेळी शेतकऱ्यांनी सांगितले.

## तिहेरी अपघातात एकाच कुटुंबातील ५ जणांसह ६ ठार

जळगाव दि.९ (प्रतिनिधी)- साखरपुड्याच्या आनंदासाठी घराबाहेर पडलेल्या एका कुटुंबावर नियतीने काळाचा घाला घातला. जळगाव जिल्ह्यातील अमळनेर-धुळे महामार्गावर मंगरूळ गावाजवळ मंगळवारी सकाळी झालेल्या भीषण तिहेरी अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. कार, एसटी बस आणि मोटारसायकल यांच्यात झालेल्या या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातात गुजरातमधील व्यारा येथील एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला असून धरणगाव येथील मोटारसायकलस्वाराचाही जागीच मृत्यू झाला आहे.

ही दुर्घटना सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास अमळनेर-धुळे रस्त्यावरील मंगरूळ गावाजवळ हॉटेल वृंदावनसमोर घडली. मोटारसायकल (एमएच-१८ सी-८७१९) आणि एसटी बस (एमएच-१३ सीयू-७५४०) ही दोन्ही वाहने अमळनेरकडून धुळ्याकडे जात होती. त्याचवेळी धुळ्याकडून भरधाव वेगाने येणारी कार (जीजे-१९ एएफ-३१४७) अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि समोरून येणाऱ्या एसटी बस व मोटारसायकलला जोरदार धडकली. धडकेचा आवाज इतका प्रचंड होता की परिसरातील नागरिक घटनास्थळाकडे धावले.

अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की मोटारसायकलचा अक्षरशः चुराडा झाला. मोटारसायकलस्वाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर कारचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला. कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याचीही संधी मिळाली नाही. कारमधील पाच जणांनी जागीच प्राण गमावले.

मृतांमध्ये गुजरातमधील व्यारा येथील आदित्य चंद्रकांत महाजन, अनिता सुरेश महाजन, निर्मला नंदलाल महाजन, नंदलाल गोपाल महाजन, सुरेश विक्रम महाजन यांचा समावेश आहे. हे सर्वजण अमळनेर येथे आयोजित साखरपुडा समारंभासाठी येत होते. मात्र, नियतीने त्यांच्यावर घाला घालत आनंदाच्या प्रवासाचे दुःखद अंतात रूपांतर केले.

## अपयशाचे बिल गरिबांच्या माथी मारणे हेच मोदींच्या लुटीचे मॉडेल-राहुल गांधी

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- केंद्र सरकारने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत अनुदानित एलपीजी सिलिंडरची वार्षिक मर्यादा नऊवरून चारवर आणली आहे. यावरुन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारच्या आर्थिक आणि परराष्ट्र धोरणांवर टीका केली. १२ वर्षांच्या गरीब-विरोधी आर्थिक धोरणांमुळे आणि तडजोडीच्या परराष्ट्र धोरणामुळे देश अशा परिस्थितीत येऊन पोहोचला आहे, जिथे लाखो गरीब कुटुंबे आणि महिलांना विषारी लाकडाचा धूर श्वासावाटे आत घेण्यास भाग पडत आहे.

काँग्रेस खासदार राहुल गांधी म्हणाले, उज्ज्वला योजनेअंतर्गत अनुदानित सिलेंडरची संख्या नऊवरून चारवर आणली आहे. इतकेच नाही, तर गेल्या तीन महिन्यांत घरगुती एलपीजी सिलेंडरच्या दरात ८९ रुपयांची वाढ केली आहे. याचा अर्थ, आधी किंमत वाढवा, मग अनुदान कमी करा आणि गरिबांच्या चुली विझवा. स्थलांतरित मजुरांची जीवनरेखा असलेल्या ५ किलोच्या सिलेंडरच्या दरात ३२३ रुपयांची वाढ केली आहे. ते काय कमावणार, काय खाणार आणि काय वाचवणार?

अब्जाधीश मित्रांचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ करणे आणि स्वतःच्या अपयशाचे बिल गरिबांच्या माथी मारणे हे मोदींचे लुटीचे मॉडेल असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली. मोदीजी, तुमच्या अपयशाचा भार फक्त गरीबच उचलणार का? तुम्ही निर्माण केलेल्या या ढासळत्या अर्थव्यवस्थेची किंमत कामगार, शेतकरी, महिला आणि मध्यमवर्ग चुकवणार का? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला.

पंतप्रधान उज्ज्वला योजनेअंतर्गत (पीएम-उज्ज्वला योजना) अनुदानात कपात करण्यासंदर्भात, सरकारने सांगितले की हा बदल सरासरी घरगुती वापर लक्षात घेऊन करण्यात आला आहे. २०१६ मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत, लाभार्थ्यांना पूर्वी दरवर्षी प्रत्येकी १४.२ किलोचे (पान ४ वर)

## प्रशासकीय गतिमानता, सुसूत्रतेसाठी मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना; उपविभागांचे स्वतंत्र विभाग

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणि सुसूत्रता येण्यासाठी मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे सध्या अस्तित्वात असणाऱ्या ३३ प्रशासकीय विभागांची संख्या ४५ होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ईज ऑफ डुईंग बिझनेस आणि ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेवर भर देण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागात सुसूत्रता आणण्यासाठी पुनर्रचना करण्यात आली. यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगवान होईल, योजनांची अंमल बजावणी आणि क्षेत्रीय यंत्रणांशी प्रभावी समन्वय साधणे शक्य होणार आहे.

सध्या मंत्रालयात ३३ प्रशासकीय विभाग होते. यामध्ये एकाच विभागात दोन अथवा तीन उपविभाग होते. उपविभाग दोन किंवा तीन असले तरी विभागाची आस्थापना एकाच विभागप्रमुखांकडे असते. यामुळे मनुष्यबळाच्या वितरणात अडचणी निर्माण होत असत. त्याचबरोबर उपविभागाचे कामकाजाचे स्वरूप भिन्न आणि स्वतंत्र आहे त्यानुसार उपविभागात स्वतंत्र सचिवामार्फत कामकाज हाताळण्यात येते. यामुळे विभागांचे सुसूत्रीकरण करुन कार्यक्षमता सुधारण्यासाठी विभागांच्या विषयांच्या कार्यासनासह पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. नवीन विभागांकरिता स्वतंत्र आस्थापना, रोख शाखा आणि नोंदणी शाखा यासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल.

मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करताना नवीन पदनिर्मिती केली जाणार नाही. संबंधित विभागातील मंजूर व रिक्त अधिकारी, कर्मचारी यांची संख्या विचारात घेऊन ती पदे नवीन निर्माण करण्यात आलेल्या विभागांना मंजूर संख्येनुसार प्रमाणशीर तत्वावर वाटप करण्यात येतील. सध्या अस्तित्वात असलेल्या विभागांचे विभाजन करून पुढीलप्रमाणे कार्यासनासह नवीन विभाग निर्माण होतील. कृषि व पदुम विभागाचे विभाजन करुन कृषि विभाग आणि पदुम विभाग असे दोन स्वतंत्र विभाग होतील. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे विभाजन स्वतंत्र सहकार विभाग, पणन विभाग आणि वस्त्रोद्योग विभाग असे तीन स्वतंत्र विभाग.

### मागील कर्जमाफी योजनेत राहिलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळणार

शेतकऱ्यांसाठी मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील कर्जमाफी योजनेत राहिलेल्या शेतकऱ्यांनाही आता कर्जमाफी मिळणार आहे. यासाठी जवळपास १४ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीत अनेक शेतकरी अडकले होते. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनेत अनेक शेतकऱ्यांना पात्र असूनही कर्जमाफीचा लाभ मिळाला नव्हता. या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा यासाठी वारंवार मागणी होत होती. त्यामुळे आज २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीत अनेक वंचित राहणाऱ्या ५ लाखपेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

**महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता**

राज्यातील नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता, विस्तारीकरणात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम व नवीन विषय, तुकडी आदी विषयांना अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयानुसार या अधिनियमातील तरतुदीनुसार नवीन (पान ४ वर)

## जयपूरमध्ये फटाक्यांच्या कारखान्याला आग; मुलासह ७ ठार

जयपूर दि.९ (वृत्तसंस्था)- जयपूरमधील खोह नागोरियान परिसरात असलेल्या फटाक्यांच्या कारखान्यात मंगळवारी सकाळी ११ वाजता भीषण आग लागली. या आगीत एका मुलासह सात जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर एक मजूर गंभीर जखमी झाला.

मृत्यू झालेल्यांमध्ये रहीम, रुबिन (१५) आणि अब्दुल वाहिद यांचा समावेश आहे. भाजल्यामुळे जखमी झालेल्यांत अजीम खान, नासीर खान, समीर खान, बिलाल आणि अशफाक यांचा समावेश आहे. त्यांना एसएमएस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयातील सूत्रांनुसार, यातील बहुतेकांचे शरीर ९० टक्क्यांपर्यंत भाजले आहे.

जयपूरचे जिल्हाधिकारी संदेश नायक यांनी सांगितले की, फटाक्यांचा कारखाना खोह नागोरियान येथील आयशा नगर तलाई क्षेत्रात आयटीआय कॉलेजजवळ आहे. काही ज्वलनशील पदार्थामुळे आग लागली आहे.

आमदार अमीन कागझी यांनी प्रश्न उपस्थित केला की, "निवासी भागात दारूगोळ्याचे गोदाम असल्याचे पोलिसांना माहीत नव्हते का? आणि कोणाच्या दबावाखाली लोक गप्प आहेत? या कारखान्याचा मालक (पान ४ वर)

## पाकव्याप्त काश्मीरमध्ये आंदोलक आणि जवानांमध्ये चकमक; ३० जणांचा मृत्यू, २०० जखमी

इस्लामाबाद दि.९ (प्रतिनिधी)- पाकव्याप्त काश्मीरमध्ये आंदोलनकर्ते आणि पाकिस्तानी सुरक्षा दलाच्या जवानांमध्ये झालेल्या चकमकीत सुमारे ३० जणांचा मृत्यू झाला असून, २०० नागरिक जखमी झाले आहेत. जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीने पाकव्याप्त काश्मीरमधील आर्थिक आणि राजकीय समस्यांवरुन सरकारविरोधात काढलेला मोर्चा अवैध ठरवत बंदी घातली. यानंतर आंदोलनकर्ते आणि पाकिस्तानी जवानांमध्ये चकमक झाली.

कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित करत जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीचा मोर्चा स्थानिक प्रशासनाने बेकायदेशीर ठरवत त्यावर बंदी घातली. गेल्या आठवड्यात शुक्रवारी रात्री रावलकोट भागात एका व्यापाऱ्याची गोळी मारुन हत्या करण्यात आली, प्रशासनाकडूनच ही हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर आंदोलक रस्त्यावर उतरले होते. रविवारी रात्री जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीच्या आंदोलकांनी रुग्णालय आणि शवगराच्या बाहेर मोठ्या संख्येने गर्दी केली. "पोलिसांनी आंदोलकांवर केलेल्या गोळीबारात सहा आंदोलकांचा मृत्यू झाला", अशी माहिती पूंछ विभागाचे पोलिस अधीक्षक सरदार वाहीद खान यांनी रॉयटर्सला दिली आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, आंदोलकांना पांगवण्यासाठी सुरक्षा दलाच्या जवानांनी प्रयत्न केला. पण, आंदोलकांनी रायफल, पेट्रोल बॉम्ब आणि विविध शस्त्रांनी लक्ष्य केलं, असे पोलिसांनी सांगितले. पाकव्याप्त काश्मीरमध्ये वाढती महागाई, वीजेचे बिल, वाढती बेरोजगारी आणि राजकीय हक्क यावरुन नागरिक रस्त्यावर उतरल्याचे वृत्त ट्रिब्युनने दिले आहे. जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीच्या नेतृत्वाखाली मंगळवारी आंदोलक रस्त्यावर उतरल्यानंतर प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई करण्यास सुरुवात केल्यानंतर आंदोलक, पोलिस आणि जवानांमध्ये चकमक उडाली, असे या बातमीत पुढे म्हटले आहे.

सरकारविरोधी आंदोलनाचे विविध व्हिडीओ आता समाज माध्यमांवर व्हायरल होऊ लागले आहेत. सोशल मीडियावर (पान ४ वर)

## सरसकट कर्जमाफीसाठी सत्ताधारी शिवसेनेचे रास्तारोको आंदोलन

अहिल्यानगर दि.९ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करावी या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी सत्ताधारी शिवसेनाप्रणित शेतकरी सेनेने आज, मंगळवारी राहुरीमध्ये रास्तारोको आंदोलन केले. शिवसेनेचे एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असते तर सरसकट कर्जमाफी लागू झाली असती, असा दावाही यावेळी बोलताना शेतकरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी केला.

शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत सरसकट कर्जमाफी करावी, त्यासाठी कोणत्याही अटी व शर्ती लागू करू नये, कृषीपंपाला दिवसा अखंड आठ तास वीजपुरवठा करावा, कांदा २५०० रुपये दराप्रमाणे खरेदी करावा, शेतीमालाला योग्य भाव मिळावा, उसाची प्रलंबित देयके शेतकऱ्यांना दिली जावीत, आदी मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना शेतकरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र मोरे म्हणाले सन २०२४ च्या विधानसभा निवडणूक दरम्यान मुख्यमंत्री (पान ४ वर)

## लातूरमध्ये वीज कोसळून बैल दगावल्याने पत्नीवर नांगर ओढण्याची वेळ



लातूर दि.९ (प्रतिनिधी)- वीज कोसळून बैल दगावला आणि दुसरा बैल खरेदी करण्याची आर्थिक ताकद नसल्याने नांगराच्या औताला पत्नीला जुंपण्याची वेळ लातूरमधील शेकऱ्यावर आली आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्याची विदारक स्थिती दाखवणारा हा हृदयद्रावक व्हिडीओ आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावरुन शेअर केला आहे. या कुटुंबाला त्वरीत मदत मिळवून देण्याची आणि शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी आमदार पवारांनी या पोस्टमधून केली आहे.

रोहित पवारांनी शेअर केलेल्या व्हिडीओ पोस्टनुसार, सदर व्हिडीओ लातूर जिल्हा, देवणी (पान ४ वर)

## आमदार संजय गायकवाडांना भाजप नेत्याकडून १०० कोटींची नोटीस, वाद चिघळला

बुलढाणा दि.९ (प्रतिनिधी)- आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे, कृत्यामुळे नेहमीच चर्चेत असलेल्या शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. कारण, आता महायुतीमधील मित्रपक्षाच्या नेत्यानेच त्यांना तब्बल १०० कोटींच्या अब्रु नुकसानीचा दावा ठोकत नोटीस बजावली आहे. काही दिवसांपूर्वी दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित पुस्तकाच्या प्रकाशकाला फोनवरुन शिवीगाळ केल्यानंतर राज्यभरातून त्यांच्याबद्दल संतप्त प्रतिक्रिया आल्या होत्या. त्यानंतर, पक्ष नेतृत्वानेही त्यांच्याबद्दल नाराजी व्यक्त करत सूचना केल्या होत्या. आता, बुलढाणा भाजप जिल्हाध्यक्षांनीच संजय गायकवाड यांना नोटीस बजावली आहे. तर, संजय गायकवाड यांच्यावर पॉक्सो, ॲट्रॉसिटी व मानवाधिकार उल्लंघन यांच्यासारखे गंभीर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी वकील असीम सरोदे यांनी केली आहे.

बुलढाण्यातील शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी गेल्या ०६ एप्रिल आणि १० एप्रिल रोजी पत्रकार (पान ४ वर)

## भारतीय सैन्यदलाचा अपमान करणाऱ्या गिरीष महाजन यांची मंत्रिमंडळ आणि भाजपातून तत्काळ हकालपट्टी करा, काँग्रेसची मागणी

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- भाजपा नेते आणि मंत्री गिरीष महाजन यांनी अमृतसर येथे ऑपरेशन ब्ल्यू स्टार संदर्भात केलेले वक्तव्य अत्यंत बेजबाबदार, राष्ट्रहिताला बाधा आणणारे आणि भारतीय सैन्यदलाच्या शौर्याचा अवमान करणारे आहे. देशाच्या अखंडतेसाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांनी दहशतवादाविरोधातील भारताच्या लढ्यालाच कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे देशविरोधी भूमिका घेणाऱ्या गिरीष महाजन यांची तात्काळ मंत्रिमंडळातून आणि भाजप पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

ऑपरेशन ब्ल्यू स्टार ही कोणत्याही धर्माविरोधातील कारवाई नव्हती, तर भारताचे तुकडे करण्याचे कारस्थान रचणाऱ्या सशस्त्र खलिस्तानी दहशतवाद्यांविरोधात भारतीय सैन्यदलाने राबविलेली अत्यंत कठीण आणि आवश्यक मोहीम होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो याची पूर्ण जाणीव असतानाही देशाच्या एकता व अखंडतेला प्राधान्य देत हा कठोर निर्णय घेतला होता. त्यानंतर खलिस्तानी अतिरेक्यांनी त्यांची हत्या केली. या मोहिमेचे नेतृत्व करणारे महाराष्ट्राचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांनाही दहशतवाद्यांनी लक्ष्य करून त्यांची हत्या केली. देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वांच्या त्यागाचा अवमान करण्याचे काम गिरीष महाजन करत आहेत.

मंत्री गिरीश महाजन यांच्या (पान ४ वर)

# हरित ऊर्जेसाठी उपयुक्त संशोधन

भारतात ऊर्जा, पर्यावरण आणि विकास या तिन्ही विषयांशी संबंधित प्रश्नांचा संगम ज्या एका विषयात दिसतो, तो म्हणजे 'ग्रीन हायड्रोजन'. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा विषय केवळ वैज्ञानिक परिषदांपुरता मर्यादित होता; परंतु आज तो जागतिक राजकारण, अर्थकारण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या चर्चेच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे. अशा वेळी 'आयआयटी' गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी विकसित केलेल्या नव्या तंत्रज्ञानाने संशोधन क्षेत्रातच नव्हे, तर भारताच्या ऊर्जा भविष्याबाबतही नव्या आशा निर्माण केल्या आहेत. पाण्यापासून स्वच्छ हायड्रोजन तयार करण्याची प्रक्रिया अधिक वेगवान, टिकाऊ आणि परिणामकारक बनवणे, हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून संशोधन करण्यात आले. साध्या भाषेत सांगायचे, तर सूर्यप्रकाश आणि पाणी यांच्या साहाय्याने स्वच्छ इंधन तयार करण्याच्या दिशेने भारताने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. हे केवळ तांत्रिक प्रगतीचे उदाहरण नाही, तर भविष्यातील ऊर्जा राजकारणात भारताला स्वतंत्र ओळख मिळवून देणारी शक्यता आहे.

आज जग ऊर्जा संकटाच्या नव्या टप्प्यावर उभे आहे. गेल्या दोन शतकांपासून औद्योगिक विकासाचा पाया कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांवर उभा राहिला; परंतु या इंधनांनी जगाला विकास दिला, तितकाच पर्यावरणीय संकटाचाही वारसा दिला. हवामानबदल, वाढते तापमान, वितळणारे हिमनग, दुष्काळ, अतिवृष्टी आणि समुद्राची वाढती पातळी हे सारे परिणाम आता प्रत्यक्ष जाणवू लागले आहेत. याच कारणामुळे जग स्वच्छ ऊर्जेकडे वळत आहे.

सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, विद्युत वाहने आणि हरित हायड्रोजन हे नव्या ऊर्जा व्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ मानले जात आहेत. यात हरित हायड्रोजनला विशेष महत्त्व दिले जात आहे, कारण ते दीर्घकालीन ऊर्जा साठवण, जड उद्योग आणि वाहतूक क्षेत्रासाठी प्रभावी पर्याय ठरू शकते. भारतासाठी हा विषय अधिक महत्त्वाचा आहे. कारण भारत जगातील सर्वांत मोठ्या ऊर्जा ग्राहकांपैकी एक आहे. देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे आणि त्याच वेगाने ऊर्जा गरजाही वाढत आहेत. आज भारत आपल्या तेलाच्या गरजांसाठी आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किमतीतील चढउतारांचा थेट परिणाम होतो. रशिया-युक्रेन युद्धानंतर जगाने ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व नव्याने अनुभवले. तेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर अवलंबून राहण्याचे धोके स्पष्ट झाले.

त्यामुळे अनेक देशांनी स्वदेशी आणि स्वच्छ ऊर्जा स्रोतांकडे लक्ष केंद्रित केले. भारतासाठी 'ग्रीन हायड्रोजन' हे त्याच धोरणात्मक बदलाचे प्रतीक आहे. 'आयआयटी' गुवाहाटीच्या संशोधनाचे महत्त्व इथेच वाढते. कारण ग्रीन हायड्रोजनसमोरील सर्वांत मोठी समस्या म्हणजे त्याच्या उत्पादनाचा खर्च आणि कार्यक्षमता. आज उपलब्ध तंत्रज्ञान महागडे आहे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादनासाठी पुरेसे कार्यक्षम नाही. त्यामुळे ग्रीन हायड्रोजन अजूनही पारंपरिक इंधनांशी स्पर्धा करू शकत नाही. गुवाहाटीतील वैज्ञानिकांनी विकसित केलेली नवी कोटिंग प्रणाली या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करते.

आयआयटी गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी अशी रचना तयार केली आहे, ज्यामुळे पाण्याचे विघटन अधिक प्रभावी पद्धतीने होते. विशेषतः प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे गॅस बुडबुडे इलेक्ट्रोडवर चिकटून राहू नयेत, यासाठी त्यांनी विशेष हायड्रोजेल थर विकसित केला आहे. त्यामुळे प्रक्रिया अधिक वेगाने आणि सातत्याने चालते. याचा अर्थ कमी वेळेत अधिक हायड्रोजन तयार होऊ शकतो. म्हणजेच उत्पादनाचा खर्च कमी होण्याची शक्यता वाढते. हे तंत्रज्ञान पुढे व्यावसायिक पातळीवर यशस्वी झाल्यास ग्रीन हायड्रोजन अधिक व्यवहार्य बनू शकते; परंतु या संशोधनाचे महत्त्व केवळ ऊर्जा उत्पादनापुरते मर्यादित नाही. त्यातून भारतातील संशोधन व्यवस्थेची क्षमतादेखील दिसून येते.

अनेकदा भारतावर 'तंत्रज्ञान आयात करणारा देश' अशी टीका केली जाते; परंतु अंतराळ, औषधनिर्मिती, डिजिटल तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञानाप्रमाणेच ऊर्जा क्षेत्रातही भारतीय संशोधन संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, हे या संशोधनातून स्पष्ट होते. एक महत्त्वाचा प्रश्न मात्र येथे उपस्थित होतो, तो म्हणजे भारत संशोधनाला पुरेसे प्राधान्य देतो का? विकसित देशांच्या तुलनेत भारताचे संशोधनावरील खर्चाचे प्रमाण अजूनही कमी आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये उत्कृष्ट प्रतिभा असूनही निधी, पायाभूत सुविधा आणि उद्योगांशी समन्वय या बाबतीत मर्यादा आहेत. अनेक संशोधन प्रकल्प प्रयोगशाळेपलीकडे जाऊ शकत नाहीत. 'ग्रीन हायड्रोजन'सारख्या क्षेत्रात ही दरी कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हे तंत्रज्ञान भविष्यातील अर्थव्यवस्थेचा पाया बनू शकते.

भविष्यात स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञान असणारे देशच जागतिक स्पर्धेत पुढे राहतील. त्यामुळे संशोधनाकडे केवळ शैक्षणिक उपलब्धी म्हणून न पाहता, राष्ट्रीय गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. भारत सरकारने राष्ट्रीय हरित हायड्रोजन अभियान सुरू करून योग्य दिशेने पाऊल टाकले आहे; परंतु हे अभियान यशस्वी होण्यासाठी संशोधन, उद्योग आणि धोरण या तिन्ही घटकांमध्ये समन्वय आवश्यक आहे. उद्योगक्षेत्राने संशोधन संस्थांशी अधिक जवळून काम केले पाहिजे. तसेच सरकारने दीर्घकालीन गुंतवणूक आणि धोरणात्मक स्थिरता दिली पाहिजे. 'ग्रीन हायड्रोजन'चे आणखी एक महत्त्वाचे अंग म्हणजे ग्रामीण आणि विकेंद्रित ऊर्जा व्यवस्था.

भारतातील अनेक भाग अजूनही स्थिर आणि स्वच्छ ऊर्जा पुरवठ्यापासून वंचित आहेत. भविष्यात लहान प्रमाणावर 'ग्रीन हायड्रोजन' उत्पादन शक्य झाले, तर ग्रामीण भागात ऊर्जा स्वावलंबनाचे नवे मॉडेल तयार होऊ शकते. शेतकरी, लघुउद्योग आणि दुर्गम भागांसाठी ही मोठी क्रांती ठरू शकते. याचबरोबर 'ग्रीन हायड्रोजन' भारताच्या औद्योगिक धोरणालाही नवी दिशा देऊ शकतो. स्टील, सिमेंट, खत आणि रसायन उद्योग हे कार्बन उत्सर्जनाचे मोठे स्रोत आहेत. या क्षेत्रांमध्ये ग्रीन हायड्रोजनचा वापर वाढवल्यास भारत औद्योगिक विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधू शकतो; मात्र या सर्व शक्यतांसोबत काही कठोर वास्तवही आहेत.

'ग्रीन हायड्रोजन'साठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छ वीज आणि पाण्याची आवश्यकता असते. भारतासारख्या देशात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमण करताना संसाधनांचा समतोल वापर महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच तंत्रज्ञानाची किंमत कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान राहणार आहे; पण इतिहास सांगतो, की सुरुवातीला महाग वाटणारे तंत्रज्ञान पुढे जाऊन सर्वसामान्य बनते. सौर ऊर्जेचे उदाहरण समोर आहे. काही वर्षांपूर्वी सौर ऊर्जा अत्यंत महाग मानली जात होती. आज ती अनेक ठिकाणी सर्वात स्वस्त ऊर्जा स्रोत ठरत आहे. 'ग्रीन हायड्रोजन'बाबत अशीच शक्यता आहे. यासाठी दीर्घकालीन दृष्टी आवश्यक आहे. ऊर्जा संक्रमण ही एका दिवसात घडणारी प्रक्रिया नाही. ती दशकांमध्ये आकार घेते.

भारताने आजपासूनच संशोधन, पायाभूत सुविधा आणि कौशल्य विकास यांवर लक्ष केंद्रित केल्यास पुढील दोन-तीन दशकांमध्ये तो 'ग्रीन हायड्रोजन' क्षेत्रात जागतिक नेतृत्व मिळवू शकतो. 'आयआयटी' गुवाहाटीचे हे संशोधन या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. हे संशोधन भारताला केवळ स्वच्छ ऊर्जा देणार नाही, तर नव्या आर्थिक संधी, औद्योगिक प्रगती आणि तंत्रज्ञानातील आत्मनिर्भरता यांचाही मार्ग मोकळा करू शकते. आजच्या जगात ऊर्जा हा केवळ आर्थिक प्रश्न राहिलेला नाही. तो राष्ट्रीय सुरक्षेशी जोडला गेला आहे. ऊर्जा स्रोतांवर नियंत्रण असणारे देशच जागतिक राजकारणात प्रभावी ठरतील. त्यामुळे 'ग्रीन हायड्रोजन'मध्ये गुंतवणूक करणे म्हणजे भविष्यातील सामरिक शक्तीत गुंतवणूक करणे होय.

# नेत्रदान : प्रकाशाचा अमूल्य वारसा

**मानवी** शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा असला तरी डोळ्यांचे स्थान सर्वाधिक अनन्यसाधारण आहे. डोळे हे केवळ शरीराचा एक अवयव नसून ते ज्ञान, अनुभव, सौंदर्य आणि जगाशी संवाद साधण्याचे माध्यम आहेत. या डोळ्यांमुळेच माणूस निसर्गातील विविध रंग अनुभवतो, आपल्या प्रिय व्यक्तींचे चेहरे पाहतो, शिक्षण घेतो, काम करतो आणि जीवनातील असंख्य आनंदाचे क्षण अनुभवतो. दृष्टी ही मानवाला लाभलेली एक अनमोल देणगी आहे. ज्यांच्या डोळ्यांतून जगाचे दर्शन घडते, त्यांना दृष्टीचे महत्त्व कदाचित नेहमी जाणवत नाही; परंतु ज्यांनी दृष्टी गमावली आहे किंवा ज्यांना जन्मतःच अंधत्व लाभले आहे, त्यांच्यासाठी दृष्टी म्हणजे संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारी शक्ती असते. अशा लाखो अंध आणि दृष्टीदोषग्रस्त व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्याची क्षमता नेत्रदानामध्ये आहे. म्हणूनच दरवर्षी १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ जनजागृतीचा कार्यक्रम नसून मानवतेचा, सामाजिक जबाबदारीचा आणि परोपकाराचा संदेश देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांतील कॉर्निया किंवा नेत्रपटल दान करणे. कॉर्निया हा डोळ्याचा सर्वात बाहेरील पारदर्शक भाग असून तो प्रकाश डोळ्याच्या आत पोहोचवण्याचे काम करतो. कॉर्नियामध्ये दोष निर्माण झाल्यास व्यक्तीला अंशतः किंवा पूर्ण अंधत्व येऊ शकते. आधुनिक वैद्यकीय विज्ञानामुळे अशा रुग्णांवर कॉर्निया प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करून त्यांची दृष्टी पुन्हा मिळवून देता येते. मृत्यूनंतर दान केलेल्या एका व्यक्तीच्या दोन्ही डोळ्यांमधील कॉर्निया दोन वेगवेगळ्या व्यक्तींना उपयोगी पडू शकतात. त्यामुळे एका व्यक्तीच्या नेत्रदानातून दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो. म्हणूनच नेत्रदानाला 'महादान' असेही म्हटले जाते.

दृष्टी ही व्यक्तीच्या जीवनमानाशी थेट संबंधित असते. एखादी व्यक्ती दृष्टी गमावते तेव्हा तिच्या जीवनातील अनेक शक्यता मर्यादित होतात. शिक्षण, रोजगार, प्रवास, सामाजिक संबंध आणि दैनंदिन जीवनातील अनेक कामे कठीण बनतात. अंधत्वामुळे व्यक्तीला मानसिक, सामाजिक आणि आर्थिक समस्यांनाही सामोरे जावे लागते. अनेकदा कुटुंबातील इतर सदस्यांवरही त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नेत्रदानाद्वारे मिळालेली दृष्टी केवळ एका व्यक्तीच्या डोळ्यांमध्ये प्रकाश आणत नाही, तर त्याच्या संपूर्ण जीवनात आशेची नवी पहाट निर्माण करते. त्यामुळे नेत्रदान हे केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवतेचे श्रेष्ठ उदाहरण आहे. जगभरात अंधत्व ही एक गंभीर आरोग्य समस्या मानली जाते. विविध आंतरराष्ट्रीय अभ्यासांनुसार कोट्यवधी लोक काही ना काही प्रकारच्या दृष्टीदोषाने ग्रस्त आहेत. त्यापैकी लाखो लोक कॉर्नियाच्या आजारांमुळे अंधत्व अनुभवत आहेत. अनेकांना कॉर्निया प्रत्यारोपणाची गरज असते; परंतु दानासाठी उपलब्ध होणाऱ्या कॉर्नियांची संख्या अत्यल्प असल्यामुळे हजारो रुग्ण प्रतीक्षा यादीत राहतात. भारतामध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अंधत्व आणि दृष्टीदोषाचे प्रमाण मोठे असून कॉर्नियाच्या अंधत्वामुळे अनेक व्यक्तींचे जीवन प्रभावित झाले आहे. देशभरात दरवर्षी लाखो कॉर्नियांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या नेत्रांची संख्या त्यापेक्षा खूपच कमी आहे. ही तफावत दूर करण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.

भारतातील नेत्रदान चळवळीचा इतिहास प्रेरणादायी आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापासून नेत्रदान आणि कॉर्निया प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती झाली. विविध वैद्यकीय संस्था, नेत्ररोगतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांनी नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. देशातील अनेक शहरांमध्ये आय बँकांची स्थापना करण्यात आली. आय बँक म्हणजे नेत्रदानातून प्राप्त झालेले कॉर्निया सुरक्षित ठेवण्याची, त्यांची तपासणी करण्याची आणि योग्य रुग्णांना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था होय. या संस्थांमुळे नेत्रदान आणि प्रत्यारोपण प्रक्रिया अधिक प्रभावी बनली आहे. तरीही लोकसंख्येच्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्याची गरज कायम आहे.

नेत्रदानाच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते मृत्यूनंतर केले जाते. जिवंत असताना व्यक्तीला कोणतीही शारीरिक हानी न होता ती नेत्रदानाचा संकल्प करू शकते. व्यक्तीच्या मृत्यूनंतर साधारणपणे चार ते सहा तासांच्या आत प्रशिक्षित वैद्यकीय पथक कॉर्निया संकलित करते. ही प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि सन्मानपूर्वक केली जाते. मृतदेहाचे विद्रूपीकरण होत नाही, चेहऱ्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही आणि अंत्यदर्शन किंवा धार्मिक विधींमध्ये कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे नेत्रदानाबाबत असलेली भीती किंवा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. समाजामध्ये नेत्रदानासंदर्भात अनेक गैरसमज आजही आढळतात. काही लोकांना वाटते की नेत्रदान केल्याने पुढील जन्मात अंधत्व येऊ शकते. काहींना असे वाटते की मृतदेहाचा अपमान होतो किंवा धार्मिक परंपरांचा भंग होतो. काही लोकांना नेत्र काढण्याच्या प्रक्रियेची भीती वाटते. प्रत्यक्षात या सर्व समजुती निराधार आहेत. जगातील प्रमुख धर्म मानवसेवा, परोपकार आणि दान यांना सर्वोच्च स्थान देतात. कोणताही धर्म नेत्रदानाला विरोध करत नाही. उलट दुसऱ्याला दृष्टीदान देणे हे अत्यंत पुण्याचे कार्य मानले जाते. त्यामुळे धार्मिक किंवा सांस्कृतिक कारणांमुळे नेत्रदान टाळण्याचे कोणतेही कारण नाही.

भारतीय संस्कृतीमध्ये दानधर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अन्नदान, वस्त्रदान, विद्यादान, रक्तदान यांसारख्या अनेक दानपरंपरा आपल्या समाजात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. नेत्रदान ही या दानपरंपरेची आधुनिक आणि अत्यंत प्रभावी अभिव्यक्ती आहे. मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याची क्षमता या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक आणि नैतिक जबाबदारीदेखील आहे.

अंधत्वाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. कुटुंबातील इतर सदस्यांनाही त्याचा मोठा फटका बसतो. अंध व्यक्तीला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी कमी होतात. काही वेळा कुटुंबातील एखाद्या सदस्याला त्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या करिअरमध्ये तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत जर त्या व्यक्तीला कॉर्निया प्रत्यारोपणाद्वारे दृष्टी मिळाली तर संपूर्ण कुटुंबाचे जीवन बदलू शकते. त्यामुळे नेत्रदानाचा लाभ केवळ एका व्यक्तीला नाही तर संपूर्ण समाजाला मिळतो.

विशेषतः बालकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व अधिक आहे. लहान वयात कॉर्नियाशी संबंधित अंधत्व आल्यास मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक विकासावर गंभीर परिणाम होतो. दृष्टीअभावी त्यांना शिक्षण घेणे, खेळणे आणि सामाजिक कौशल्ये विकसित करणे कठीण जाते. योग्य वेळी कॉर्निया प्रत्यारोपण झाल्यास अशा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलू शकते. ते इतर मुलांप्रमाणे शिक्षण घेऊ शकतात, करिअर घडवू शकतात आणि समाजात स्वाभिमानाने जगू शकतात. म्हणूनच नेत्रदान हे भविष्य घडविणारे दान मानले जाते.

जागतिक नेत्रदान दिनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे. अनेक लोकांना नेत्रदानाची प्रक्रिया, त्याचे फायदे आणि त्यामागील वैज्ञानिक सत्य यांची माहिती नसते. त्यामुळे विविध शासकीय संस्था, आरोग्य विभाग, वैद्यकीय महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्था या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. जनजागृती रॅली, व्याख्याने, चर्चासत्रे, नेत्रतपासणी शिबिरे, निबंध स्पर्धा आणि सामाजिक माध्यमांवरील मोहिमा यांद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचविला जातो. या उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते. ग्रामीण भारतामध्ये नेत्रदानाविषयी जागरूकतेचा अभाव तुलनेने अधिक आहे. अनेक गावांमध्ये आय बँकांची माहिती उपलब्ध नसते. काही ठिकाणी अंधश्रद्धा आणि गैरसमज अधिक प्रमाणात आढळतात. त्यामुळे ग्रामीण भागात विशेष मोहिमा राबविण्याची गरज आहे. आशा सेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जनजागृती वाढविता येऊ शकते. ग्रामीण समाजामध्ये विश्वासार्ह स्थान असलेल्या व्यक्तींनी नेत्रदानाचा प्रचार केल्यास त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो.

शिक्षण क्षेत्राची भूमिकाही या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना नेत्रदानाविषयी माहिती देणे आवश्यक आहे. युवक वर्ग हा समाजातील परिवर्तनाचा प्रमुख घटक आहे. जर तरुण पिढीने नेत्रदानाचा स्वीकार केला, तर भविष्यात नेत्रदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करून अंधश्रद्धा दूर करण्याचे काम शिक्षण संस्थांमार्फत प्रभावीपणे करता येते. प्रसारमाध्यमे ही जनजागृतीची प्रभावी साधने आहेत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांद्वारे नेत्रदानाविषयी माहिती व्यापक प्रमाणात पोहोचविता येते. यशस्वी कॉर्निया प्रत्यारोपण झालेल्या व्यक्तींच्या कथा समाजापर्यंत पोहोचवल्यास लोकांमध्ये प्रेरणा निर्माण होते. एखाद्या व्यक्तीने पुन्हा आपल्या आई-वडिलांचा चेहरा पाहिला, आपल्या मुलांना पाहिले किंवा अनेक वर्षांनंतर निसर्गाचा अनुभव घेतला, अशा कथा लोकांच्या मनाला स्पर्श करतात आणि नेत्रदानाबाबत सकारात्मक विचार निर्माण करतात. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज कॉर्निया प्रत्यारोपणाची यशस्वीता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अत्याधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, सुधारित जतन पद्धती आणि प्रशिक्षित तज्ज्ञांमुळे अनेक रुग्णांना उत्तम परिणाम मिळत आहेत. त्यामुळे नेत्रदानातून मिळणाऱ्या लाभांची व्याप्ती अधिक वाढली आहे. भविष्यात जैवतंत्रज्ञान आणि संशोधनामुळे या क्षेत्रात आणखी प्रगती होण्याची अपेक्षा आहे. तथापि, कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध असले तरी दानासाठी आवश्यक कॉर्निया मिळाले नाहीत तर प्रत्यारोपण शक्य होणार नाही. म्हणूनच नेत्रदानाची गरज कायम महत्त्वाची राहणार आहे. नेत्रदानाचा निर्णय वैयक्तिक असला तरी त्याची अंमलबजावणी कुटुंबाच्या सहकार्यावर अवलंबून असते. अनेक वेळा व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केलेला असतो; परंतु मृत्यूनंतर कुटुंबीयांना त्याची माहिती नसल्यामुळे दान होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कुटुंबीयांशी या विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे. मृत्यूनंतर आपले नेत्र दान करण्याची इच्छा स्पष्टपणे व्यक्त करणे गरजेचे आहे. अशा संवादामुळे कुटुंबीयही या निर्णयाचा सन्मान करण्यास तयार होतात.

समाजातील प्रसिद्ध व्यक्तींची भूमिका देखील महत्त्वाची आहे. कलाकार, साहित्यिक, क्रीडापटू, सामाजिक कार्यकर्ते आणि धार्मिक नेते यांनी नेत्रदानाचा संदेश दिल्यास त्याचा व्यापक प्रभाव पडतो. अनेक लोक आपल्या आदर्श व्यक्तींचे अनुकरण करतात. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी नेत्रदानाविषयी खुलेपणाने भूमिका मांडणे आवश्यक आहे. त्यांच्या सहभागामुळे जनजागृती मोहिमांना अधिक बळ मिळू शकते. नेत्रदान आणि मानवता यांचा अतूट संबंध आहे. माणूस आपल्या आयुष्यात अनेक प्रकारे समाजासाठी योगदान देतो; परंतु मृत्यूनंतरही समाजाच्या सेवेसाठी काहीतरी देऊन जाण्याची संधी फार कमी क्षेत्रांमध्ये उपलब्ध असते. नेत्रदान ही अशीच एक संधी आहे. जीवनाचा शेवट हा दुसऱ्या कोणाच्या नव्या सुरुवातीचे कारण ठरू शकतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचे नेत्र दोन अंध व्यक्तींना प्रकाश देऊ शकतात, ही कल्पनाच किती प्रेरणादायी आहे.

आजच्या काळात नेत्रदानाबाबतची माहिती मिळवणे आणि नोंदणी करणेही सोपे झाले आहे. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. तथापि, केवळ नोंदणी करून थांबणे पुरेसे नाही. समाजामध्ये या विषयावर संवाद वाढविणे, इतरांना प्रेरित करणे आणि नेत्रदानाच्या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक संस्था या कार्यात सहभागी झाली तर अंधत्वाविरुद्धची लढाई अधिक प्रभावी ठरू शकते. जागतिक नेत्रदान दिन हा आपल्याला आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. दृष्टी ही जीवनातील अमूल्य संपत्ती आहे आणि ती दुसऱ्याला देण्याची संधी नेत्रदानामध्ये आहे. आपण जिवंत असताना समाजासाठी जे काही करतो, त्यापलीकडे जाऊन मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची ताकद या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नाही, तर ती मानवतेचा उत्सव आहे. मानवजातीच्या इतिहासात दान, त्याग आणि परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान मिळाले आहे. नेत्रदान ही त्या परंपरेची आधुनिक अभिव्यक्ती आहे. एखाद्या अंध व्यक्तीच्या डोळ्यांत पुन्हा प्रकाश निर्माण करणे, त्याला स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देणे यापेक्षा मोठी मानवसेवा कोणती असू शकते? म्हणूनच प्रत्येकाने नेत्रदानाचा गांभीर्याने विचार करावा. आपल्या कुटुंबीयांशी याबाबत चर्चा करावी आणि समाजामध्येही या विषयाची जागरूकता वाढवावी. अखेरीस असे म्हणता येईल की, नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतरही जिवंत राहण्याचा एक सुंदर मार्ग आहे. शरीर नश्वर असले तरी आपल्या नेत्रांमधून निर्माण झालेला प्रकाश अनेक वर्षे दुसऱ्यांच्या आयुष्यात झळकत राहू शकतो. अंधाराने वेढलेल्या एखाद्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे, हीच नेत्रदानाची खरी ताकद आहे. जागतिक नेत्रदान दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की दृष्टीचा हा अमूल्य वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अंधत्वमुक्त समाज घडविण्यासाठी नेत्रदानाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत नेऊया. कारण मृत्यूनंतरही जर आपले डोळे कोणाच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणार असतील, तर त्यापेक्षा मोठे दान आणि त्यापेक्षा मोठी मानवसेवा दुसरी कोणतीच असू शकत नाही.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# 'अमृत'तर्फे 'मानसमित्र'चे मोफत प्रशिक्षण;समुपदेशन क्षेत्रात संधी

छत्रपती संभाजीनगर, दि. ९(प्रतिनिधी)- महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) मार्फत 'अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची पहिल्या बॅचसाठी दि.१५ ते २२ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज करावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या रूपाने कार्यरत असलेल्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) मार्फत हा अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था चरहरीरीहींर Institute of Mental Health (MIMH), पुणे ही तांत्रिक भागीदार (Technical Partner) म्हणून कार्यरत राहणार आहे. हा समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम मानसशास्त्र, समुपदेशन आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील युवक-युवतींसाठी स्वयंरोजगार, व्यावसायिक विकास आणि समाजोपयोगी कार्याची मोठी संधी उपलब्ध करून देणार आहे.

**प्रशिक्षणात समाविष्ट बाबी** – विद्यार्थी समुपदेशनाची मूलतत्त्वे, बाल व किशोर मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये व सक्रिय श्रवण, तणाव व्यवस्थापन व भावनिक स्वास्थ्य, जीवनकौशल्य शिक्षण, आत्महत्या प्रतिबंध आणि संकट व्यवस्थापन, सायबर सुरक्षा व डिजिटल आरोग्य, पालक व शिक्षकांसोबत समन्वय, मानसिक आरोग्य जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन, शाळा आधारित समुपदेशन व रेफरल प्रणाली

**प्रशिक्षणानंतर उपलब्ध होणाऱ्या संधी–** प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना शाळा व महाविद्यालयीन समुपदेशक,मानसमित्र समुपदेशक,जीवनकौशल्य प्रशिक्षक,मानसिक आरोग्य जनजागृती प्रशिक्षक,पालक व शिक्षक कार्यशाळा समन्वयक,विद्यार्थी कल्याण अधिकारी,स्वयंरोजगाराच्या माध्यमातून समुपदेशन सेवा इ. क्षेत्रात संधी उपलब्ध होऊ शकतात.

**कौशल्य विकास प्रशिक्षण–** अमृत मानसमित्र अंतर्गत विद्यार्थी समुपदेशकांसाठी विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षणामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष समुपदेशन कौशल्ये, केस स्टडी, रोल प्ले, सुपरव्हिजन, मार्गदर्शन आणि क्षेत्रीय अनुभव यांचा समावेश असेल.

**प्रशिक्षणाचे स्वरूप** – हे प्रशिक्षण ऑफलाईन व ऑनलाईन असे दोन्ही स्वरुपात असेल. १५ दिवस प्रत्यक्ष वर्ग प्रशिक्षण नंतर एक महिन्याची निरीक्षणाधारित क्षेत्रीय नियुक्ती तसेच ऑनलाइन तज्ज्ञ सत्रे व केस चर्चा व सहा महिन्यांचे मार्गदर्शन व सुपरव्हिजन यामुळे कार्यरत व्यावसायिक, विद्यार्थी आणि इतर इच्छुकांना प्रशिक्षणात सहभागी होणे सुलभ होईल.

**निवड प्रक्रिया** – प्रत्येक जिल्ह्यातील गरज, विद्यार्थी संख्या आणि उपलब्ध संसाधनांचा विचार करून प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाईल. सर्वसाधारणपणे प्रत्येक बॅचमध्ये किमान २० ते कमाल ३० उमेदवारांना प्रवेश दिला जाईल.

**पात्रता** – शैक्षणिक पात्रता – एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र,एम.ए./एम.एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र,मास्टर ऑफ सोशल वर्क (चडथ).

डोमिसाईल, उत्पन्नाचा दाखला, जातीचा पुरावा.

**प्रशिक्षण स्थळ आणि निवास व्यवस्था–** सहा महिन्यांच्या एकूण प्रशिक्षण कार्यक्रमापैकी १५ दिवसांचे ऑफलाइन प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथे होणार आहे. या कालावधीतील निवास व भोजनाची व्यवस्था विद्यार्थ्यांनी स्वतः करायची आहे.

**मोफत प्रशिक्षण–** अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांचा या सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाचा शैक्षणिक खर्च अमृत संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. म्हणजेच पात्र उमेदवारांना हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत उपलब्ध होणार आहे.

**अर्ज कसा करावा?–** अर्ज करण्यासाठी अमृत संस्थेच्या अधिकृत (https://mahaamrut.org.in/ ) संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज भरता येईल.यासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील. अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवारांना 'प्रथम येईल त्यास प्राधान्य' या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. पहिल्या बॅचसाठी अर्जाची मुदत दि.१५ ते २२ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येईल. छाननीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांना ई-मेल अथवा संदेशाद्वारे कळिवण्यात येईल. मुदतीत प्रवेश न घेतल्यास प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी देण्यात येईल.

**अधिक माहितीसाठी संपर्क–** या योजनेबाबत अधिक माहितीसाठी उमेदवारांनी आपल्या जिल्ह्यातील अमृत कार्यालयाला भेट देऊन जिल्हा व्यवस्थापकांशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता:- विभागीय व जिल्हा कार्यालय अमृत, पुंडलिक नगर रोड, सेक्टर -४ सिडको, हनुमान नगर पाण्याच्या टाकीजवळ, छत्रपती संभाजीनगर .पि को :४३१००९ संपर्क:- ७३९१०६५४७५ / ९४०३२००६०६

# आषाढीवारीसाठी लंडनहून निघाली दिंडी, ११ देशातून ५० दिवसाचा प्रवास

पंढरपूर, दि. ९ (प्रतिनिधी)- येत्या २६ जुलै रोजी पंढरपूरमध्ये आषाढी वारीचा सोहळा साजरा होणार आहे. या सोहळ्याचे देशभरातील वारकऱ्यांना वेध लागले आहेत. यावेळी सोहळ्याचे मुख्य आकर्षण असणार आहे लंडनहून येणाऱ्या दिंडीचे, ६ जूनला या दिंडीने प्रस्थान ठेवले असून ११ देशांचा प्रवास करुन एकादशीच्या सोहळ्यात हे मराठमोळे वारकरी सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्राची संस्कृती असणारी पंढरपूरची वारी ग्लोबल होत आहे. लडनहून निघालेली दिंडी विठूनामाचा गजर करत युरोपातून आता भारताकडे निघाली आहे. युरोपातील वेगवेगळ्या देशात ती मुक्कम करणार आहे.

जवळपास ५० दिवसांचा हा प्रवास असणार आहे. परदेशात राहणाऱ्या मराठी लोकांची ही दिंडी भारतात येणार आहे. ६ जुलैला या दिंडीचे लंडन येथून प्रस्थान झाले आहे. पंढरपूर मध्ये २५ जुलैला पहिली ग्लोबल वारी येवून दाखल होणार आहे. विशेष म्हणजे भगव्या पताका, टाळ मृदुंगाचा गजर, आणि पालखी घेऊन ही दिंडी लंडन मधून निघाली आहे. यावेळी १०० ढोल ताशांचा निनाद देखील झाला. याचा विश्वविक्रम ही मराठी लोकांच्या नावे लंडनमध्ये नोंदवला गेला आहे. दरम्यान आषाढी वारीसाठी वारकऱ्यांचे आराध्य दैवत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान ८ जुलै रोजी होणार आहे. आळंदीतून माऊलींची पालखी प्रस्थान ठेवेल. ३३ दिवसांच्या या प्रवासानंतर हा सोहळा ८ ऑगस्ट रोजी पुन्हा आळंदीत परतणार आहे. आळंदी देवस्थानचे विश्वस्त आणि दिंडी समाज संघटन यांनी ही माहिती दिली आहे.

या मराठी विठ्ठल भक्ताच्या संकल्पनेतून दिंडीची आयोजन अनिल खेडकर या मराठी विठ्ठल भक्ताच्या संकल्पनेतून लंडन ते पंढरपूर या दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. ही वारी लंडनहून दि.६ जून रोजी रवाना झाली, त्यावेळी मोठ्या संख्येने भक्त यावेळी उपस्थित होते.

**देशातून करणार प्रवास–** यंदा थेट लंडनमधील विंडसर येथून पंढरपूरकडे मराठी लोकांची दिंडी निघाली आहे.

ही दिंडी लंडन, नेदरलँड, बेल्जियम, फ्रान्स, लक्झमबर्ग, जर्मनी, पोलड, झेक रिपब्लिक, हंगेरी, तुर्की, जॉर्जिया अशा देशांचा प्रवास करणार आहे. त्यानंतर ती भारतात दाखल होणार आहे.

# मोफत वीज सवलत व गणेश उत्सव भत्ता योजना लाभासाठी अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२०२८ जाहीर झालेले आहे. त्यानुसार राज्यातील हातमाग विणकर कुटुंबांना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज सवलत देण्याची व गणेश चतुर्थी निमित्त पाच पारंपारिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना गणेश उत्सव भत्ता योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेचा लाभ घेणेकरीता नोंदणीकृत विणकरांकडून अर्ज मागविले आहेत.

सदर अर्ज प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, बाळासाहेब पवार सहकार भवन, तिसरा मजला, जाफर गेट, छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत विहित नमुन्यातील अर्ज दिनांक २५ जून.२०२६ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

नोंदणीकृत विणकरांनी याबाबतचे आपले परिपूर्ण अर्ज दिनांक २५ जूनपर्यंत प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग संभाजीनगर कार्यालयाकडे कागदपत्रासह सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या htt{s://www.dirtexmah.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच सदर अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग यांचे कार्यालयात उपलब्ध आहे, असे उपआयुक्त, वस्त्रोद्योग, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकारद्वारे कळिवले आहे.

# इयत्ता १० वी, १२ वी पुरवणी परीक्षा; ५८१९ विद्यार्थ्यांसाठी २४ केंद्रांवर सज्जता



छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- इयत्ता १० वी व १२ वी म्हणजेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून लगेच पुरवणी परीक्षा घेण्यात येते. यंदा ही परीक्षा १६ जून ते ८ जुलै या कालावधीत होणार आहे. या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक आज पार पडली.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., शिक्षणाधिकारी (माध्य.) श्रीमती आश्विनी लाठकर, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, सर्व गटशिक्षणाधिकारी, पोलीस दलाचे अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. ह्या दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या.

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात इयत्ता १० वीचे २९२८ विद्यार्थी हे १४ केंद्रांवर तर इयत्ता १२ वी चे २८९१ विद्यार्थी १० परीक्षा केंद्रांवर आपली परीक्षा देतील. इयत्ता १० वी ची परीक्षा ही दि.१६ ते ३० जून दरम्यान होणार आहे तर इयत्ता १२ वी ची परीक्षा दि.१६ जून ते ८ जुलै दरम्यान होणार आहे.

विद्यार्थ्यांना तणावमुक्त वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच परीक्षेत कोणतेही गैरप्रकार होऊ नये यासाठीही प्रशासनाने विविध उपाययोजना राबविल्या आहेत. त्यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. शिवाय झूम यंत्रणेद्वारे प्रत्येक परीक्षा केंद्रावरील हालचालींवर मुख्यालयातील नियंत्रण कक्षातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. भरारी पथके सज्ज करण्यात आली आहेत.विद्यार्थ्यांना पुर्वतयारीसाठी सराव सत्रे घेण्यात आली आहेत. तसेच मानसिक समुपदेशनही करण्यात आले आहे. या शिवाय परीक्षा केंद्रा बाहेर पोलीस बंदोबस्त आदी सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्याचेही श्रीमती लाठकर यांनी बैठकीत सांगितले.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, विद्यार्थ्यांना निर्भय वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी सर्व यंत्रणांनी सम न्वयाने काम करावे. कॉपी सारखे गैरप्रकार रोखण्यासाठीही सगळ्यांनी सज्ज रहावे,असे निर्देश त्यांनी दिले. तसेच परीक्षेसाठी जिल्हाधिकारी गौडा यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छाही दिल्या.

# संत रविदास फाउंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव




छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- संत रविदास फाउंडेशनच्या वतीने इयत्ता सातवी, आठवी व नववीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवार, दि. ७ जून २०२६ रोजी विठ्ठलनगर येथील संत रोहिदास मंदिरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक व निवृत्त न्यायमूर्ती प्रमोद घाटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले सत्यशोधक समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक ॲड. के. ई. हरिदास उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे 'शिवाजी कोण होता?' हे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सुमारे ३० गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, स्कूल बॅग व रजिस्टरचे वाटप करून त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात अधिक प्रगती करून समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून केले.

याप्रसंगी ॲड. के. ई. हरिदास, संस्थेचे अध्यक्ष बालाजी सोनटक्के, निवृत्त न्यायमूर्ती प्रमोद घाटे, प्राचार्य निर्मला भामदे व प्राध्यापिका पुष्पा उत्कर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संस्थेचे सचिव भास्कर लहाने यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. विश्वनाथ उतकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र उसरे, अशोकराव कुबडे, ताराचंद गायकवाड, सुभाष गायकवाड, राजेश बोंद्रे, वैभव उसरे, धनंजय लहाने, आदित्य लहाने, समर्थ सोनवणे, व्ही. एन. जगताप, तुकाराम कुबडे, श्रीमती नरोडे, मंगेश जगताप, कबीर गवळे, सुरेखा लहाने, श्रीमती आशा वाघ, सुनिता गायकवाड, श्री गरड, सोमनाथ वाघमारे आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'प्लास्टिकमुक्त' अभियानात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



पुणे - ( प्रतिनिधी ) - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीच्या तपपुर्ती निमित्त रहाटणी - पिंपळे सौदागर भाजपा मंडलच्यावतीने पवना नदीकाठ परिसरातील प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या आणि कचरा गोळा करुन परिसराची स्वच्छता करण्यात आली. मंगळवार दि. ९ जून रोजी सकाळी अकरा वाजता आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात पवना नदीकाठी असलेल्या महादेव मंदिर तसेच खंडोबा मंदिराच्या परिसरातही यावेळी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या स्वच्छता अभिनयात पिंपळे सौदागर येथील नगरसेविका अनिता काटे तसेच संदिप काटे, मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकिर, जयनाथ काटे, भरत काटे, संदेश काटे, मनोज ब्राह्मणकर, रेखा काटे , अनिता चोपडे, कल्पना बागूल, अशोक वारकर, सुरेश मोरे, रमेश काळे आदींनी सहभाग दर्शविला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतील स्वच्छ भारत ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणण्याच्या दृष्टीने आपण ज्या भागात वास्तव्यास आहोत तो परिसर स्वच्छ ठेऊन योगदान दर्शवावे या भूमिकेतून हे अभियान असल्याची प्रतिक्रिया अनिता काटे यांनी यावेळी व्यक्त केली. तर रहाटणी - पिंपळे सौदागर भाजपाचे मंडल अध्यक्ष सोम नाथ तापकिर यांनी आयोजनाची भूमिका विषद करताना विश्वास, विकास आणि जनकल्याण या माध्यमातून साकारलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तपपुर्ती कारकिर्दिनिमित्त ' प्लास्टिक मुक्त भारत ' या अभियानाव्दारे परिसर स्वच्छतेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले.

# किशोरवयीन मुलांच्या पालकत्वातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम



छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात किशोरवयीन मुलांच्या वागणुकीत, विचारांमध्ये आणि पालकांशी असलेल्या नातेसंबंधांमध्ये अनेक बदल होत आहेत.

या बदलत्या परिस्थितीत पालकांना योग्य मार्गदर्शन मिळावे आणि किशोरवयीन मुलांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता यावे या उद्देशाने इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स (IAP), छत्रपती संभाजीनगर आणि छत्रपती संभाजीनगर पेडियाट्रिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने किशोरवयीन पालकत्व बदलत्या जगातील बदलते नाते' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दिनांक १३ जून २०२६ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत, तापडिया नाट्यमंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

किशोरवयीन मुलांच्या पालकत्वातील आव्हानांना सजगपणे सामोरे जाण्याचा आणि पालक-मुलांमधील नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे.

या कार्यक्रमात प्रख्यात तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत :

डॉ. नंदू मुलमुले - ज्येष्ठ म नोविकार तज्ज्ञ, नांदेड

डॉ. शिरीषा साठे - ज्येष्ठ सायकोलॉजिस्ट व कौन्सेलर, पुणे

डॉ. शिल्पा मनसबदार - बालम नोविशेषज्ञ, सिडनी (ऑस्ट्रेलिया)

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. संध्या कोडपल्ले आणि डॉ. नीती सोनी कार्यरत आहेत. तसेच डॉ. प्रशांत जाधव व डॉ. आसावरी कौशिक हे संयोजक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

छ. संभाजीनगर पेडियाट्रिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संध्या कोडपल्ले व सचिव डॉ. विनोद तोतला यांनी सर्व पालकांना या उपयुक्त कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

हा कार्यक्रम फक्त पालकांसाठी असून मुलांना सोबत आणू नये, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# 'दर महिन्याला एक उपवास' बनला जनजागृतीचा अभियान

## आचार्य प्रसन्न सागरजी यांना 'युगप्रधान तप चक्रवर्ती' उपाधीने गौरविण्यात आले




छत्रपती संभाजीनगर , दि. ९ (प्रतिनिधी) - अंतर्मना आचार्य श्री १०८ प्रसन्न सागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात रविवारी नवकार गार्डन येथे आयोजित करण्यात आलेला 'दर महिन्याला एक उपवास' हा कार्यक्रम श्रद्धा, भक्ती, साधना, त्याग आणि आध्यात्मिक ऊर्जे चा अनुपम संगम ठरला. या प्रसंगी दिगंबर बीसपंथी सम ाज, कुशलगड यांच्या वतीने आचार्यश्रींना प्रशस्तिपत्र प्रदान करून 'युगप्रधान तप चक्रवर्ती' या मानाच्या उपाधीने सन्मानित करण्यात आले.

या उपाधीचे प्रशस्तिवाचन योगगुरू स्वामी रामदेव यांचे राष्ट्रीय प्रवक्ते तसेच पतंजली योगपीठाचे मीडिया प्रभारी एस. के. तिजारावाला यांनी केले. दिगंबर बीसपंथी समाजाचे अध्यक्ष जयंतीलाल सेठ यांनी सांगितले की, कार्यक्रमाची सुरुवात पहाटे भव्य शोभायात्रेने झाली. नगरातील प्रमुख म ार्गांवरून निघालेली ही शोभायात्रा नवकार गार्डन येथे पोहोचली. श्रद्धाळूंनी गुरुदेवांच्या जयघोषांनी संपूर्ण वातावरण धर्ममय केले.

कार्यक्रमादरम्यान आचार्यश्रींच्या मासिक पत्रिकेचे तसेच विशेष प्रकाशनाचे भव्य लोकार्पण करण्यात आले. या सोहळ्यात दिगंबर बीसपंथी समाजाचे अध्यक्ष जयंतीलाल सेठ, मंत्री हंसमुखलाल सेठ, पतंजली योगपीठाचे मीडिया प्रभारी एस. के. तिजारावाला, समाजसेवक प्रदीप जैन, क्षेत्रीय आमदार रमिला खडिया, माजी संसदीय सचिव भीमाभाई डामोर, भारत भक्ती संस्थान, मुंबईचे संस्थापक बाबा सत्यनारायण मौर्य यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आचार्यश्रींचे पादप्रक्षालन माजी तहसीलदार विजयलाल कोठारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते करण्यात आले. धर्मसभेत मुनिश्री सामायिक सागरजी म हाराज यांनी ध्यान व योग सत्राचे मार्गदर्शन करताना सांगितले की, ध्यान आणि योग हे आत्मबल, मानसिक शांतता आणि निरोगी जीवनाचे आधारस्तंभ आहेत. त्यांनी सर्वांना नियमित योग व ध्यान करण्याची प्रेरणा दिली.

अंतर्मना आचार्य प्रसन्न सागरजी महाराज यांनी उपस्थित श्रद्धाळूंना दर महिन्याला किमान एक दिवस उपवास करण्याचा, सात्त्विक जीवनशैली स्वीकारण्याचा तसेच समाजात सदाचार आणि संस्कारांचा प्रसार करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले.

यावेळी स्वामी रामदेव यांचे राष्ट्रीय प्रवक्ते एस. के. तिजारावाला म्हणाले की, आचार्य प्रसन्न सागर महाराज यांचे तप, त्याग आणि संयम हे आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहेत. 'दर महिन्याला एक उपवास' हे अभियान केवळ धार्मिक कार्यक्रम नसून निरोगी, सुसंस्कृत आणि जागरूक समाज घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे.

कार्यक्रमात कला आणि संस्कृतीचेही सुंदर दर्शन घडले. विक्रमा कनेरिया (पिपलिया मंडी) यांनी सुरेल बासरीवादन सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच अवघ्या चार मि निटांत आचार्यश्रींचे चित्र रेखाटून सर्वांना आश्चर्यचकित केले. बाबा सत्यनारायण मौर्य यांनी आपल्या ओजस्वी कवितांमधून भारतीय संस्कृती, राष्ट्रभक्ती आणि आध्यात्मिक मूल्यांचा संदेश दिला. तर प्रसिद्ध गायक विजय चौहान (देवास) यांनी मधुर भजने आणि कर्णमधुर सादरीकरणातून संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून टाकले.

या कार्यक्रमात स्थानकवासी श्रीसंघाचे अध्यक्ष रजनीकांत खाब्या, मूर्तिपूजक श्रीसंघाचे अध्यक्ष संघवी कमलेश कावडिया, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे खंड संचालक कैलाश राव, ब्राह्मण समाजाचे ॲड. हरेंद्र पाठक, दयानंद आश्रमचे ॲड. धर्मेंद्र कंसारा, राम मंदिर समितीचे अध्यक्ष मुकेश अग्रवाल, पंडित हेमेंद्र पांड्या यांच्यासह विविध सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, यांनी दिली.

# अब्दुल सत्तारांना सर्वात मोठा धक्का : औरंगाबाद जिल्हा बँक निवडणुकीत समीर सत्तारांचा अर्ज बाद


छत्रपती संभाजीनगर , दि. ९ (प्रतिनिधी) - विधानपरिषद निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर अब्दुल सत्तार यांनी 'औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके'च्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केलं होतं. ही बँक जिंकण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्तीने भाजप-शिवसेनेमध्ये दुरावा मिटवण्याचा प्रयत्न झाला.

या घडामोडी सुरू असतानाच अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांचाच उमेदवारी अर्ज बाद झाला आहे. त्यामुळे सत्तार यांना मोठा धक्का बसला आहे.

औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आपल्या ताब्यात राहावी यासाठी दबावतंत्राचे राजकारण करत विधानपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला खोडा घालण्याचा प्रयत्न शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांनी केला होता. राज्यात महायुती असताना भाजपच्या अधिकृत उमेदवार सुहास शिरसाट यांच्या विरोधात सत्तार यांनी मुलगा समीर याला बंडखोरी करायला लावून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. माघारीसाठी वापरलेल्या या दबावतंत्राचा जिल्हा बँकेतील सत्ता राखण्यात उपयोग होईल या भ्रमात असलेल्या अब्दुल सत्तार यांच्या भ्रमाचा भोपळा अखेर आज फुटला आहे. अब्दुल समीर अब्दुल सत्तार यांचा संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठीचा उमेदवारी अर्ज आक्षेपानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद केला आहे. मुलाचा अर्ज बाद झाल्यामुळे अब्दुल सत्तार हे प्रचंड संतापले असून ते आता आपला पुढचा डाव टाकण्याच्या तयारीत आहेत. विधानपरिषद निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर समीर सत्तार यांनी आता पक्षाने आपलाही विचार केला पाहिजे असे म्हणत औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत अर्ज दाखल केला होता. सुरुवातीपासूनच हा उमेदवारी अर्ज वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. केवळ समीर सत्तारच नाही तर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट त्यांच्या कन्या हर्षदा शिरसाट वैजापूरचे शिवसेना आमदार रमेश बोरणारे, कन्नडच्या संजना जाधव या सर्वांच्या अर्जावर भाजप व इतर पक्षाच्या उमेदवारांनी आक्षेप नोंदवले होते.

# गांधींच्या सेवाग्राम आश्रमात तीन दिवसीय नशाबंदी मंडळाच्या संघटकांची संवाद, समन्वय व वार्षिक नियोजन बैठक संपन्न

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्यच्या महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकाचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन शुक्रवार ५ जून ते ७ जून पर्यंत यात्री निवास, सेवाग्राम आश्रम,जिल्हा वर्धा याठिकाणी आयोजित करण्यात आली. या ठिकाणी संघटकाना २०२६-२७ ची मान्यता तसेच वर्षभरात संघटकांच्या कार्याचे नियोजन करण्यात आले. संघटकांना साहित्यात पोस्टर, पत्रक, महामानवाने विचारांचे पुस्तक, व्यसनमुक्ती वरील सापशिडी देण्यात आली. यावेळी संघटक बैठकीचे उद्घाटन कल्याणयात्रा व वार्षिक कार्य अहवालच्या प्रदर्शनीचे नशाबंदी मंडळाचे अध्यक्ष माजी मुंबई विद्यापीठ कुलगुरू डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक/ चिटणीस अमोल मडामे, चिटणीस चंद्रकांत चौधरी, सदस्य बॉस्को डिसुझा, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष वर्धा चे डॉ. नितिका व त्याची टिम हे उपस्थित होते. यावेळी ३६ जिल्ह्यातील संघटक, ६ विभाग प्रमुख, नशाबंदी मंडळाचे कार्यालय कर्मचारी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजन वेळूकर यांनी संस्था चालवतांना कशा पद्धतीने फंड गोळा केला पाहिजे त्यासाठी संस्थेचे प्रेझेंटेशन कसे असावे यावर मार्गदर्शन केले. तसेच नशाबंदी मंडळाच्या जिल्हा संघटक यांचे कौतुक केले त्यांना सूर्याची उपमा दिली. मंडळाला पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना नशाबंदी मंडळाचे मुख्य संघटक व चिटणीस अमोल स. भा. मडामे यांनी केले, वर्षभरात आपल्या जिल्ह्यात विशेष कार्यकेल्याबद्दल सिंधुदुर्ग जिल्हा संघटक अर्पिता मुंबरकर यांना गोल्डन मेडल देऊन तर नागपूर जिल्हा संघटक गौरव आळणे यांना सिल्वर मेडल तर पालघर जिल्हा संघटक मिलिंद पाटील यांना ब्रान्स मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विभागीय संघटक प्रमुख म्हणून उत्तम काम केल्याबद्दल प्रथम क्रमांक पुणे विभाग प्रमुख ॲड. सुरेश संकटे व यांची टिम यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम तीन हजार रूपये तर दुसरा क्रमांक कोकण विभाग प्रमुख दिशा कळंबे व यांची टिम यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम दोन हजार रूपये देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. त्यानंतर नशाबंदी मंडळाचे ३६ संघटकानी आपला परिचय देऊन विभाग प्रमुखांची निवड करण्यात आले. तसेच अहवाल लेखन, ऑनलाइन बैठकीविषयी सूचना तसेच कल्याण यात्रा विषयी सूचना मुख्य संघटक यांनी दिल्या. संघटकांना व्यसनमुक्तीची किती माहिती आहे? हे जाणून घेण्यासाठी बोल बच्चन हा खेळ सरचिटणीस यांनी घेतला.



दुसऱ्या दिवशी ६ जून रोजी रॅली कॉल ने दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर ३६ संघटकानी आपल्या जिल्ह्यांची ऐतिहासिक ओळख, व्यसनमुक्ती केंद्र, शाळा, कॉलेज, आश्रम शाळा, वसतिगृहे किती आहेत सांगुन जिल्ह्याचा परिचय देण्यास सांगण्यात आले. तसेच विभागानुसार बसून जिल्हा संघटक यांचे वार्षिक कार्यक्रम नियोजन करण्यात आले. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात किमान ३ शाळा व ३ कॉलेज तंबाखूमुक्त करण्याचा व प्रत्येक जिल्ह्यात ड्रग्स फ्री जिल्हा अभियान राबवून नशा मुक्त भारत अभियानास अधिक बळ देण्याचा संकल्प करण्यात आला. संध्याकाळी सेवाग्राम आश्रम भेट व सर्व धर्मप्रार्थना मध्ये सहभाग घेतला रात्री संघटक यांनी पथनाट्य सादरीकरण करण्यात आले.तिसऱ्या दिवशी म्हणजेच ७ जून रोजी, सकाळी नशाबंदी मंडळाचे कार्यकारी सदस्य बॉस्को डिसुझा यांनी नवीन अंमली पदार्थांची ओळख! या विषयावर मार्गदर्शन केले. तर नशाबंदी मंडळाचे कार्यकारी सदस्य सुजाता सावंत यांनी जिल्ह्यात फंड कशाप्रकारे उभा करता येईल या वर मार्गदर्शन केले. बैठक सम ारोप प्रसंगी जिल्हा परिषद वर्धा चे जिल्हा समाजकल्याण विभागाचे निरीक्षक राज मरापे यांनी भेट देऊन संघटकाचे कौतुक केले व सदिच्छा दिल्या. त्यांच्या हस्ते प्रत्येक संघटकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन शिबिराचा समारोप झाला.

या तीन दिवसीय बैठकीत छत्रपती संभाजीनगर जिल्हा संघटक व मराठवाडा विभागीय संघटक म्हणून भाऊसाहेब अण्णासाहेब पठाडे यांची नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी पठाडे यांनी जिल्ह्यात व्यसनमुक्तीचे कार्य अधिक जोमात होण्याकरता स्वतः प्रयत्नशील राहून तसेच प्रशासनाची मदत घेऊन, जनसामान्या सहभागी करून घेऊन व्यसनमुक्त संभाजीनगर जिल्हा निर्माण करण्याचा संकल्प केला.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# घनकचरा व्यवस्थापन नियमांची स्थानिक स्वराज्य संस्थांनी अंमलबजावणी करावी; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ प्रभावी अंमल बजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावी,असे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती, छावणी मंडळे, सिडको, एमआयडीसी तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांना हे आदेश दिले असून त्यावर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष 'एसडब्ल्यूएम कक्ष' स्थापन करण्यात आला आहे.

यासंदर्भात आज जारी केलेल्या आदेशानुसार, सर्वोच्च न्यायालयाने घनकचरा व्यवस्थापन अनुच्छेद २१ अंतर्गत नागरिकांच्या जीवनाच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी (शहरी व ग्रामिण) या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या अंमल बजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ अंतर्गत विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार,जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना ओला, सुका, सॅनिटरी आणि घरगुती धोकादायक अशा चार प्रकारांमध्ये कचऱ्याचे स्त्रोतावरच विलगीकरण सक्तीने लागू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विलगीकरण न केलेला कचरा देणाऱ्या घरांवर व व्यावसायिक आस्थापनांवर तात्काळ दंड आकारण्यात येणार आहे. कचरा संकलनासाठी गळती व दुर्गंधीमुक्त बंदिस्त वाहनांचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे.

उपयोगकर्ता शुल्क आकारणीबाबतही कठोर भूमिका घेत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना तातडीने शुल्क वसुली सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निवासी घरे, दुकाने, रुग्णालये, हॉटेल्स, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये, खरेदी केंद्रे आदी सर्व प्रकारच्या कचरा निर्मात्यांसाठी शुल्क संरचना निश्चित करण्यात आली असून त्यात दरवर्षी किमान पाच टक्के वाढ अनिवार्य राहणार आहे.



विलगीकरण न केलेला कचरा देणे, कचरा जाळणे, सार्वजनिक कार्यक्रमानंतर परिसर स्वच्छ न ठेवणे यांसारख्या उल्लंघनांसाठी दंड आकारणीची मानक संरचना लागू करण्यात आली आहे. पुनरावृत्ती झाल्यास दंडाची रक्कम वाढविण्यात येणार आहे.

मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, गृहनिर्माण संकुले, रुग्णालये, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक संकुलांना बल्क वेस्ट जनरेटर म्हणून नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशा सर्व संस्थांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पोर्टलवर नोंदणी करून स्वतःच्या स्तरावर ओल्या कचऱ्याची प्रक्रिया करणे आवश्यक राहणार आहे. नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या संस्थांचा पाणी व वीजपुरवठा खंडित करण्याचे अधिकारही विशेष कक्षाला देण्यात आले आहेत.

प्रत्येक स्थानिक संस्थेने सामग्री पुर्नप्राप्ती केंद्रे (एमआरएफ), आरआरआर केंद्रे उभारणे, उघड्यावर कचरा टाकण्याच्या ठिकाणांचे उच्चाटन करणे तसेच पुनर्वापर उद्योगांशी करार करणे आवश्यक राहणार आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दर पंधरवड्याला अनुपालन अहवाल आणि भू-स्थानांकित छायाचित्रांसह प्रगती अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

घनकचरा व्यवस्थापनाबाबतच्या निर्देशांचे पालन न करणे, उपयोगकर्ता शुल्क संकलनात अपयश, आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात निष्काळजीपणा किंवा माहिती सादर न करणे हे पर्यावरण कायद्यांचे जाणूनबुजून उल्लंघन आणि सर्वोच्च न्यायालयाचा अवमान मानण्यात येईल. अशा प्रकरणांमध्ये संबंधित स्थानिक संस्था अथवा नियोजन प्राधिकरणाच्या प्रमुखांविरुद्ध पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ अंतर्गत वैयक्तिक फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

या अंमलबजावणीचो कार्यान्वयनाबाबत जिल्हा मुख्यालयात विशेष एसडब्ल्यूएम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. त्याचे अध्यक्ष जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे आहेत तर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. हे सदस्य आहेत. नगरपरिषद प्रशासनाचे सहआयुक्त सौरभ जोशी हे सह सदस्य सचिव असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी मनीष होळकर या सदस्य सचिव आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अधिकृत व अनधिकृत कचरा डेपोंची अचानक तपासणी करून थेट जिल्हाधिकारी कार्यालयास भू-स्थानांकित व वेळ नोंद असलेले छायाचित्रात्मक पुरावे सादर करण्यात येणार आहेत.

## प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना अंतिम मुदतीपूर्वी रक्कम भरण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या सदनिकांच्या वाटप प्रक्रियेत निवड झालेल्या लाभार्थ्यांना सदनिकेच्या एकूण किंमतीपैकी १० टक्के रक्कम भरण्यासाठी अंतिम संधी देण्यात आली आहे.या बाबत मा.आयुक्त श्री अमोल येडगे यांनी काल दि.०८ जून रोजी त्यांचे दालनात आढावा बैठक घेतली होती.

महानगरपालिकेतर्फे यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत विविध प्रकल्पांतील एकूण ११,१२० सदनिकांच्या विक्रीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. स्वतःचे पक्के घर नसलेले तसेच वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

सुंदरवाडी, पडेगाव, हर्सूल आणि तिसगाव येथील गृहप्रकल्पांमधील पात्र लाभार्थ्यांची निवड ३० मार्च २०२६ रोजी सोडत प्रक्रियेद्वारे करण्यात आली. निवड झालेल्या लाभार्थ्यांना सदनिकेच्या एकूण किंमतीपैकी १० टक्के रक्कम भरण्याबाबत टपालाद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. या रकमेच्या भरण्यासाठी ६ जून २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

तथापि, अनेक लाभार्थ्यांकडून अद्यापही १० टक्के रक्कम जमा करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेने अंतिम मुदत १८ जून २०२६ पर्यंत वाढविली आहे. या कालावधीत संबंधित लाभार्थ्यांनी आवश्यक रक्कम जमा करणे बंधनकारक असून, मुदतीत रक्कम न भरल्यास त्यांना वाटप करण्यात आलेल्या सदनिकेवरील हक्क रद्द करण्यात येणार आहेत.

तसेच, रद्द झालेल्या सदनिकांचे वाटप प्रतीक्षा यादीतील अथवा इतर पात्र अर्जदारांना करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी अंतिम मुदतीची नोंद घेऊन तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मोफत वाळू देण्यासाठी जलसमाधी आंदोलन; अवैध उत्खनन तत्काळ बंद करण्याची मागणी

पैठण दि.९ (प्रतिनिधी)- घरकुल लाभार्थींना शासनाच्या मोफत वाळू योजनेचा लाभ मिळत नसल्याच्या निषेधार्थ तसेच वाढत्या अवैध वाळू उत्खननाविरोधात छावा क्रांतीवीर सेनाच्या वतीने सोमवारी गोदावरी नदीपात्रात सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत जलसमाधी आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी नदीपात्रात उतरून प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला. घरकुलाच्या गरीब लाभार्थींना हक्काची वाळू द्या, 'वाळू माफियांना संरक्षण देणे बंद करा' 'अवैध वाळू उत्खनन तत्काळ बंद करा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

आंदोलनकर्त्यांनी मोफत वाळू योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याचा आरोप केला. शासनाने घरकुल लाभार्थींसाठी मोफत वाळू योजना जाहीर केली असली, तरी प्रत्यक्षात गरजू नागरिकांना वाळू मिळत नसल्याने अनेकांची घरे रखडल्याचे त्यांनी सांगितले.

या आंदोलनात अनिल राऊत, साईनाथ कर्डिले, शिवाजी साबळे, रामेश्वर बावणे, भगवान सोरमारे, कृष्णा काळे, गणेश औटे, गणेश पवार यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा १४ जून रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित 'महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६'ही दि.१४ जून, रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्हा केंद्रावर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षा सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या वेळेत घेण्यात येणार आहे.

या परीक्षेसाठी प्रशासनाने तयारी केली असून, छत्रपती संभाजीनगरमध्ये एकूण ६४ परीक्षा उपकेंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या परीक्षा केंद्रांवर एकूण २०,६६६ उमेदवारांना आयोगाकडून प्रवेश देण्यात आले आहेत. परीक्षेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण २हजार १४३ अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परीक्षेच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी आयोगाचे विशेष अधिकारी उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उमेदवाराला उपलब्ध करून दिलेल्या प्रवेश पत्रातील नमूद परीक्षा केंद्रावर वेळेत हजर राहण्याची आणि परीक्षा संबंधित सर्व सूचनाचे पालन करण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत खरीप हंगामासाठी प्रमाणित बियाणे वितरणास सुरुवात

## तुर, मुग, उडीद, बाजरी व नाचणी पिकांसाठी शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ; विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान तसेच कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत खरीप हंगामासाठी प्रमाणित बियाणे वितरण कार्यक्रम राबविण्यात येत असून छत्रपती संभाजीनगर विभागातील तीनही जिल्ह्यांसाठी लक्षांक प्राप्त झाला आहे.

पिकांची उत्पादकता वाढविणे, सुधारित व संकरीत वाणांचा प्रसार करणे तसेच बियाणे बदलाचा दर वाढविणे या उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी दिली.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानाच्या तृणधान्य घटकांतर्गत विभागासाठी १० वर्षांच्या आतील वाणांच्या बाजरी पिकासाठी २,४१० क्विंटल व नाचणी पिकासाठी १०० क्विंटल, असा एकूण २,५१० क्विंटल प्रमाणित बियाणे वितरणाचा लक्षांक प्राप्त झाला आहे. या बियाण्यांसाठी प्रति क्विंटल ३ हजार रुपये अनुदान देय आहे. तसेच भरडधान्य घटकांतर्गत १,२८५ क्विंटल बियाणे वितरणाचा लक्षांक असून किमतीच्या ५० टक्के अथवा कमाल १० हजार रुपये प्रति क्विंटल या मर्यादेत अनुदान देण्यात येणार आहे.

कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत ५ वर्षांच्या आतील वाणांसाठी तुर पिकाचे २,७०० क्विंटल, मुग पिकाचे १,४१० क्विंटल व उडीद पिकाचे २,२५० क्विंटल असे लक्षांक निश्चित करण्यात आले आहेत. तसेच ५ वर्षांपेक्षा अधिक व १० वर्षांच्या आतील वाणांसाठी तुर पिकाचे २,३७० क्विंटल, मुग पिकाचे १,४५० क्विंटल आणि उडीद पिकाचे ३,५९० क्विंटल प्रमाणित बियाणे वितरणाचे लक्षांक प्राप्त झाले आहेत. ५ वर्षांच्या आतील बियाण्यांसाठी प्रति क्विंटल ६ हजार रुपये तर ५ ते १० वर्षांच्या आतील बियाण्यांसाठी प्रति क्विंटल ३ हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य प्रति शेतकरी कमाल एक हेक्टर क्षेत्रापुरते मर्यादित राहणार आहे. महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृभको आदी बियाणे पुरवठादार संस्थांच्या अधिकृत वितरकांमार्फत ७/१२ उताऱ्याच्या आधारे 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावर प्रमाणित बियाण्यांचे वितरण करण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी आपल्या तालुक्यातील कृषी विभागाच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे.

## ऑनलाइन खत विक्रीची सक्ती शिथिल करा; आमदार सतीश चव्हाण यांची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- राज्य शासनाने छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर यावर्षीपासून ऑनलाइन फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल (खत विक्री अर्ज प्रणाली) ॲपव्दारे खत विक्री अनिवार्य केली आहे. मात्र या नव्या प्रणालीतील जाचक तांत्रिक अटींमुळे शेतकऱ्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे ऑनलाइन खत विक्रीची सक्ती तातडीने शिथिल करावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी राज्याचे कृषी मंत्री मा.ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली.

यासंदर्भात आमदार सतीश चव्हाण यांनी आज मुंबई येथे कृषी मंत्र्यांची भेट घेऊन ऑनलाइन खत विक्रीच्या सक्ती संदर्भात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी निदर्शनास आणून दिल्या. शासनाने खत विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी ही प्रणाली विकसीत केली असली तरी सदर प्रणालीमध्ये अनेक तांत्रिक त्रुटी असल्याने ऐन खरीप हंगामात शेतकऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटीची कमतरता, सर्व्हर वारंवार डाऊन होणे यामुळे शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी कृषी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच शेतकऱ्यांना तात्काळ खते उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या वर्षीच्या खरीप हंगामापुरती खत विक्री ऑफलाइन पध्दतीने सुरू ठेवण्याची मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधून होत असल्याचे देखील आमदार सतीश चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेता ऑनलाइन खत विक्रीची सक्ती शिथिल करून चालु खरीप हंगामासाठी खत विक्री ऑफलाइन पध्दतीने सुरू ठेवावी अशी आग्रही मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली.

## जिल्ह्यातील उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी औद्योगिक संस्थांनी पुढाकार घ्यावा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील निर्यातीक्षम उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबरोबरच 'निर्यातक्षम जिल्हा' म्हणून विकसित करण्यासाठी औद्योगिक संघटनानी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात 'जिल्हा निर्यात प्रोत्साहन समिती' ची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती करुणा खरात, विदेश व्यापार अधिकारी श्री. अजय कोरला, सीएमआयएचे उत्सव मच्छर, निर्यातदार श्री. ऋषिकेश जाजू ,इंजिनिअरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचे श्री. मुकेश समतानी, एमएसएसआयडीसीचे श्री. निखिल चौधरी, एमएसएमई कार्यालयाच्या सहायक संचालक श्रीमती सुनिता धयाल, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी श्री. प्रेषित मोघे, मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर (मासिया), चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अॅड ॲग्रीकल्चर (सीएमआयए) निर्यातदार मिहिर सौंदळगेकर, राजेंद्र चौधरी व विरेन पाटील, उद्योग क्रांतीचे सुरेश फुलारे तसेच विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, निर्यातदार आणि बँकिंग क्षेत्रातील अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील निर्यातदारांना येणाऱ्या अडचणी, पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक, कौशल्य विकास आणि उत्पादनांची गुणवत्ता वृद्धी यावर चर्चा करण्यात आली.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना निर्यात क्षेत्राकडे आकर्षित करण्यासाठी विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम राबवण्यावर भर द्यावा असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले. 'जिल्हा निर्यात केंद्र' उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील विद्यमान व संभाव्य निर्यातदारांचा अद्ययावत डेटाबेस तयार करून त्यांना आवश्यक साहाय्य व प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

दि. १६ व १७ जून २०२६ रोजी संभाजीनगर जिल्ह्यात होणाऱ्या 'रिव्हर्स बायर-सेलर मीट'मध्ये जास्तीत जास्त औद्योगिक क्षेत्रातील निर्यात दार यांनी सहभाग नोंदवण्याचे आवाहन औद्योगिक संघटनांना करण्यात आले. जिल्ह्याला महाराष्ट्रातील एक अग्रगण्य 'निर्यात जिल्हा' म्हणून विकसित करण्यात सर्वांचा सहभाग आवश्यक असून जिल्ह्यामध्ये उत्पादित होणाऱ्या विविध कृषी उत्पादन . ऑटोमोबाईल्स व इतर उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न करावेत असे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी सांगितले.

(पान १ वरुन)

### अपयशाचे बिल गरिबांच्या माथी..

१२ अनुदानित सिलिंडर मिळत होते. गेल्या वर्षी अनुदानित सिलिंडरची संख्या नऊवर आणण्यात आली होती आणि आता ती आणखी कमी करून चार करण्यात आली आहे. मे २०२२ मध्ये, सरकारने उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी प्रति सिलेंडर २०० चे अनुदान सुरू केले, जे नंतर ऑक्टोबर २०२३ मध्ये वाढवून ३०० करण्यात आले. हे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. मध्य-पूर्वेतील संकटाच्या काळात, आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या आणि एलपीजीच्या किमतींमध्ये तीव्र चढ-उतार झाला, ज्याचा परिणाम भारतावर झाला.

### प्रशासकीय गतिमानता,....

महाविद्यालय किंवा परिसंस्था चालू करण्यास तसेच त्यांना परवानगी देण्यास ३० जून, २०२६ ची मुदत राहणार आहे. या अधिनियम, २०१६ मधील प्रस्तावित मुदतवाढ कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांनादेखील लागू राहणार आहे.

वस्तू व सेवा कर परिषदेच्या ५६ व्या बैठकीमध्ये भारत सरकारने केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ च्या विविध कलमांमध्ये सुधारणा केलेल्या आहेत. या तरतुदींशी सुसंगत आणि सुसूत्र अशा सुधारणा करण्यास बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करण्यात येणार असून त्याबाबतच्या प्रारूपास मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्ज उभारणीच्या अधिकारात वाढ करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला पुरंदर विमानतळ जमीन संपादनासाठी हुडकोकडून ६ हजार कोटींचे कर्ज घेण्यास शासनाने मान्यता व शासनहमी दिली आहे. सध्या पुरंदर विमानतळाकरिता जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. तसेच राज्यात विविध औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे व आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात जमीन संपादन सुरू आहे. यात शेतकऱ्यांना योग्य भरपाई देण्यासाठी; तसेच नवीन औद्योगिक प्रकल्प व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अतिरिक्त आर्थिक संसाधनांची महामंडळाला आवश्यकता भासणार आहे. त्यादृष्टीने महामंडळाच्या कर्ज उभारणीच्या सध्याच्या मर्यादेत वाढ करण्यासाठी या अधिनियमातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

### जयपूरमध्ये फटाक्यांच्या...

कोण आहे, याबद्दलही काहीच माहिती उपलब्ध नाही.'' आमदारांनी पुढे म्हटले की, जबाबदार लोक कदाचित असा दावा करतील की मृत व्यक्ती राजस्थानमधील नव्हत्या; पण याचा अर्थ त्यांचे प्राण मौल्यवान नव्हते असा होतो का? हे तुमचेच अपयश आहे.

### पाकव्याप्त काश्मीरमध्ये...

व्हायरल होणाऱ्या व्हिडिओंमध्ये बरनाला, भिमबर आणि मीरपूर येथे आंदोलकांची मोठी गर्दी जमलेली दिसत आहे. मुझफ्फराबादमध्ये सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आंदोलकांवर अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या. जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीचे कार्यकर्ते आणि पाकिस्तानी सुरक्षा दलांमध्ये झालेल्या संघर्षानंतर तणाव वाढल्याने शहरातील बाजारपेठा बंद असल्याचे इतर फुटेजमध्ये दिसत आहे.

### सरसकट कर्जमाफीसाठा...

देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची घोषणा केली मात्र आता कर्जमाफी करताना ज्या अटी व शर्ती लागू करण्यात आल्या, त्यातून १० टक्के शेतकऱ्यांनाही कर्जमाफी मिळणार नाही. साखर, कांद्याला निर्यातबंदी करून, कापूस आयात करून सरकारने शेतकऱ्यांचे नुकसान केले, असाही आरोप त्यांनी केला.

शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असते तर त्यांनी कोणत्याही अटी व शर्ती लागू न करता सरसकट कर्जमाफी केली असती कारण ते शेतकरी पुत्र आहेत, असा उल्लेख करत मोरे यांनी अप्रत्यक्षपणे भाजप व मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर आपला रोख व्यक्त केला.

### लातूरमध्ये वीज कोसळून बैल...

तालुक्यातील बांबळी गावातील आहे. ''काशिनाथ गायकवाड असे या शेतकऱ्याचे नाव असून, त्यांचा एक बैल वीज कोसळून दगावला आणि दुसरा बैल खरेदी करण्याची त्यांची आर्थिक स्थिती नाही त्यामुळे त्यांच्यावर नांगराच्या औताला पत्नीला जुंपण्याची वेळ ओढवली'', असे रोहित पवारांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. अन्नदात्याची विदारक स्थिती असल्याचे आमदार पवारांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

देशाचं पोट भरण्यासाठी राबणाऱ्या अन्नदात्या कुटुंबाला जनावराची जागा घ्यावी लागते हे अत्यंत वेदनादायी आहे, असे म्हणत पवारांनी शेतकऱ्याला मदत मिळवून देण्याची विनंती केली. ''स्थानिक अधिकारी, लोकप्रतिनिधी, मंत्र्यांनी या घटनेची दखल घेऊन कुटुंबाला त्वरीत मदत मिळवून द्यावी'', अशी विनंती त्यांनी केली. तसेच, बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी विनाअट सरसकट कर्जमाफी करण्याची मागणीही त्यांनी केली.

व्हिडीओमधील महिला त्यांचे नाव हौसाबाई काशिनाथ गायकवाड असल्याचे सांगत आहेत. गेल्या आठवड्यात शुक्रवारी बैलावर वीज कोसळून त्याचा मृत्यू झाल्याने औत ओढण्याची वेळ आल्याचे त्या सांगत आहेत. हौसाबाई त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीच असल्याचे व्हिडीओत सांगत आहेत. वीज कोसळून बैल दगावल्यानंतर अधिकाऱ्यांनी पाहणी केली मात्र मदत मिळाली नसल्याचे हौसाबाई सांगत आहेत. तसेच, औत ओढताना शारीरिक वेदना, त्रास होत असल्याची कैफियत देखील त्यांनी मांडली.

### आमदार संजय गायकवाडांना...

परिषदेत बुलढाणा भाजपचे जिल्हाध्यक्ष व माजी आमदार विजयराज शिंदे यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले होते. त्यावरुन जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. आता, याप्रकरणी भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी वकील असीम सरोदे यांच्यामार्फत संजय गायकवाड यांना १०० कोटी रुपयांच्या अब्रू नुकसानीची नोटीस पाठवली आहे. शिवाय पंधरा दिवसात सार्वजनिकरित्या माफीही मागायला सांगितली आहे.

### भारतीय सैन्यदलाचा...

विधानाने भारतीय जनता पक्ष व रा. स्व. संघाची राष्ट्रविघातक प्रवृत्ती समोर आली आहे. इंदिरा गांधी यांनी ऑपरेशन ब्लू स्टार राबविले नसते तर देशाचे तुकडे पडले असते, देशाच्या अखंडतेसाठी इंदिराजी यांना बलिदान द्यावे लागले त्यावरही महाजन शंका उपस्थित करतात हे अत्यंत आक्षेपार्ह व निषेधार्ह आहे असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

विशेष म्हणजे देशाचे विद्यमान राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल हे देखील या कारवाईशी संबंधित सुरक्षा मोहिमांमध्ये सहभागी होते. मग गिरीष महाजन त्यांच्या भूमिकेचाही निषेध करणार आहेत का? त्यांची राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पदावरून हकालपट्टी करण्याची मागणी करणार आहेत का? त्यांच्यात ती हिंमत आहे का, असा सवाल सपकाळ यांनी केला.

## गुटखा माफियांची गय केली जाणार नाही; छत्रपती संभाजीनगरमधील घटनेवर मंत्री नरहरी झिरवाळ संतप्त

मुंबई/छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथे गुटखा माफियांविरोधात सुरू असलेल्या धडक कारवाईदरम्यान महिला अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या अंगावर वाहन घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याची गंभीर घटना घडली. या घटनेनंतर राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी तातडीने दखल घेत संबंधित महिला अधिकाऱ्यांशी थेट फोनवरून संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास दिला. तसेच मंत्री नरहरी झिरवाळ यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. 'प्रशासकीय कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांवर हल्ले करणाऱ्या गुटखा माफियांची गय केली जाणार नाही,' असा इशारा त्यांनी दिला आहे.

याबाबत अधिक माहिती देताना मंत्री झिरवाळ म्हणाले, 'शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या आमच्या अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत शासन आणि प्रशासन अत्यंत गंभीर आहे. या कठीण काळात संपूर्ण प्रशासन त्या महिला अधिकारी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.'

या प्रकरणातील दोषींवर आणि संबंधित गुटखा माफियांवर कठोरतम कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पोलिस प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन विभागाला देण्यात आले असून, गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत.

मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मात्र अशा दबावतंत्राला बळी न पडता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. 'जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही. कायद्याचे राज्य कायम ठेवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.